| MHRT140002092024 | **नियमित दिवाणी दावा क्र.३७/२०२४**<br>(रघुनाथ गणपत कडव<br>विरूध्द<br>दत्ताराम शिवराम कडव व.८) |
|---|---|

## निशाणी क्र.२७ वरील आदेश

प्रतिवादी क्र. १ यांनी प्रस्तुत अर्ज त्यांचेविरुध्द झालेला ''विना कैफियत'' आदेश रद्द होऊन कैफियत दाखल करणेसाठी केला आहे.

२. प्रतिवादींचे कथन असे की, योग्य अशी कागदपत्रे वेळेत उपलब्ध झाली नसलेने प्रतिवादीतर्फे म्हणणे व कैफियत देता आली नाही. मे. कोर्टाने दि.२०/०२/२०२५ रोजी प्रतिवादी यांचे विरूध्द ''विना कैफियत'' आदेश पारित केला आहे. प्रतिवादी यांनी जाणुनबुजून म्हणणे व कैफियत देणेस विलंब केलेला नाही. सबब, प्रतिवादी यांचे विरूध्द झालेला ''विना कैफियत'' आदेश रद्द होणे गरजेचे आहे. तसे न झालेस प्रतिवादीवर अन्याय होणार असून कधीही न भरून येणारे पैशाचे स्वरूपातील आर्थिक नुकसान होणार आहे. याउलट वादी यांचे कोणतेही नुकसान होणारे नाही. त्यामुळे प्रतिवादी यांस कैफियत दाखल करणेस पुरेशी संधी मिळणेची गरजेची असून कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेस विनंती केली आहे.

३. वादीने अर्जावर म्हणणे दाखल करुन सदर अर्जास आक्षेप नोंदविला आहे. त्यांचे म्हणणे असे की, प्रतिवादी यांना कैफियत देणेकरीता पुरेशी संधी देणेत आली होती. अर्जात नमूद कारण संयुक्तीक नसलेने अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुत दावा हा वाद मिळकतीचे सरस, निरस व तुटक वाटप करून मिळणेकरीता दाखल केला आहे.

प्रतिवादी हे सदर दाव्यात हजर झाले आहेत. दाव्याचे स्वरुप पाहता, दावा मिळकतीमध्ये त्यांचे हित गुंतल्याचे दिसते. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रतिवादींना समन्स प्राप्त झाल्यानंतर ते हजर झाले आहेत. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी हे कैफियतीद्वारे त्यांचे म्हणणे देऊ इच्छित आहेत. परंतु कैफियत दाखल करण्यास प्रतिवादींना जो विलंब झालेला आहे त्याचा विचार करता, सदर विलंबासाठी प्रतिवादींवर खर्च बसवणे आवश्यक आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याच्या दृष्टीकोनातून प्रतिवादीचा अर्ज खर्चासह मंजुर करणे न्यायोचित ठरेल. करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१. अर्ज खर्च रक्कम रुपये ३००/- वादीला देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ विरुध्द झालेला ''विना कैफियत'' आदेश रद्द करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र. १ ने सदरची रक्कम वादीला दिल्यानंतर त्याची कैफियत अभिलेखावर घेणेत यावी.

AMRUTA CHARUDATTA JOSHI

Digitally signed by AMRUTA CHARUDATTA JOSHI
Date: 2025.07.02 16:08:57 +0530

**स्थळ : मंडणगड** **(अमृता चा. जोशी)**
**दिनांक : २७/०६/२०२५** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंडणगड.**

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order. | | |
| Court Name | :- | Civil Judge, J.D. & J.M.F.C., Mandangad, Taluka Mandangad, District- Ratnagiri. |
| Name of Stenographer | :- | Shri. A. J. Sagvekar |
| Date of Decision | :- | 27/06/2025 |
| Judgment/order signed by P.O. on | :- | 27/06/2025 |
| Judgment/order uploaded on | :- | 02/07/2025 |